अनुभव

डॉ. पवन चांडक

**विठ्ठल हे ध्यासाचे प्रतीक मानले तर ज्याचा त्याचा विठ्ठल वेगळा असू शकतो. एचआयव्हीग्रस्त मुलांच्या प्रश्नांचा प्रसार या विठ्ठलासाठी दोन तरुणांनी सायकलवरून केलेली पंढरीची वारी हे त्याचं अनोखं उदाहरण म्हणता येईल.**



# आमच्या विठ्ठलासाठी आमचीही वारी

गेली दोन वर्षे वारीच्या काळात मी परभणी ते पंढरपूर असा दोन दिवसांचा सायकल प्रवास करतो. ही तिसरी वेळ. सायकल वारी म्हटले की एक वेगळाच उत्साह व उत्कंठा असते. या वेळेस माऊलीचे दर्शन घेऊन पंढरपूर गाठावे असा निर्णय झाला. शिवा सर आणि संदीप साखरे आणि मी असा आमचा सोबत जायचा प्लान होता परंतु काही कारणामुळे दोघांना जमले नाही मग एकटाच जायचा निर्णय झाला. सचिन घोगरे हा उत्साही सायकलस्वारही यायला तयार झाला. रेल्वे पार्सल ऑफिसमध्ये सायकल बुक करायला गेलो तर बुकिंग ऑफिसरसुद्धा एकेकाळचे टॉपचे सायक्लीस्ट निघाले. त्यांनी नियमाप्रमाणे बुकिंग तर केलेच, पण मला सायकलिंगविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. २९ जूनला पनवेल एक्स्प्रेसने पुण्याला सकाळी पोहोचलो. सातपर्यंत पार्सल ऑफिसच्या फॉर्मेलिटी आटपून बाहेर आलो तर किसन, अजय हे दोघे चळवळीतील कार्यकर्ते स्वागताला उभे होते. त्यांच्या अभ्यासिकेतील विद्यार्थी, महात्मा गांधी विचार मंचचे कार्यकर्ते, पर्यावरणवादी यांच्याशी चर्चा झाली. आजवर एचआयव्ही बाधितांच्या प्रश्नांवर सुरू असलेले कार्य, पुनर्वसन यावर प्रकाश टाकला व महाराष्ट्र, गुजरात, राजस्थानमध्ये केलेल्या एड्स जनजागृती सायकलिंग मोहिमेतील विविध अनुभव कथन केले. पुढे सायकलने आळंदीकडे निघालो तर वाटेत रिपरिप पावसाने व चिखलाने पूर्ण कपडे माखून टाकले. रेनकोट न घालणे महागात पडले. नऊ वाजता आळंदीत पोहोचून स्वच्छ होऊन मी आणि सचिनने ज्ञानेश्वर माऊलीच्या समाधीचे दर्शन घेतले. आमच्या सायकली व त्यावरील एड्स जनजागृती बोर्ड सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. जे विचारतील त्यांना आम्ही आमच्या सायकलवारी व उद्देशाबद्दल मनमोकळेपणे सांगत होतो. दहा वाजता पुण्याकडे निघालो. वाटेत दिघीजवळ चहा घेतला तेव्हा तेथील माउलीने आम्हाला पावसापासून संरक्षण करण्यासाठी कापड दिले व शुभेच्छा दिल्या. रस्ता माहीत नसल्याने हायवेने जाणे आम्हाला अवघड गेले. विश्रांतवाडीपासून येरवडा, नगर हायवे, खराडी बायपासपर्यंत प्रचंड ट्रॅफिक जामचा सामना करावा लागला. खराडी



लोकप्रभा Fri, 14 July 2017
epaper.lokprabha.com/c/20636968



बायपास येथे लिंबू सरबत प्यायला थांबलो तर एका ताईने आम्हाला विचारले की ज्यांच्यासाठी तुम्ही ही सायकलवारी करता, त्यांची काही चूक आहे, असं तुम्हाला वाटत नाही का? मी तिला विचारले की, एचआयव्हीच्या प्रसारामागे असुरक्षित लैंगिक संबंध हे एकच कारण आहे का? महाराष्ट्रातील त्या २७ हजार मुलांची काय चूक आहे जी आज एचआयव्हीसह जगत आहेत ? त्यातील बहुतेकांच्या आईवडिलांचा मृत्यूदेखील झालाय. आम्ही त्यांचं शिक्षण, आरोग्य व पुनर्वसन, १८ वर्ष पूर्ण झाल्यावर स्वयंरोजगार व प्रशिक्षणासाठी कार्य करतोय. शेवटी त्या माऊलीचा निरोप घेतला कारण आम्हाला जनजागृती करायची होती. वादविवाद नव्हे.

पुढे ट्रॅफिकमधून मार्ग काढत पाऊणला हडपसर गाठले तर भिगवण अजून ९२ किमी. याचा अर्थ सकाळपासून आम्ही सायकलवरून पाच तासात केवळ ५५ किमी अंतर गाठले होते. थोडी केळी खाऊन आम्ही सोलापूर हायवेने निघालो. वाऱ्याचा छान सपोर्ट मिळत होता. चुकीच्या दिशेने येणाऱ्या वाहनांमुळे काळजीपूर्वक पांढऱ्या पट्ट्यावरून सायकल चालवत होतो. पुढे उरळी येथे थोडा ब्रेक घेतला. बाटलीत पाणी भरून घेतले. तिथे देखील प्रश्नांची सरबत्ती, संवाद व जनजागृती. मग यवत गाठले. सचिनच्या सायकलच्या चेनमधून आवाज येत होता. चेन साफ करून थोडी ऑइलिंग करून निघालो. चौफुल्याला चौकात थोडे स्ट्रेचिंग केले. पाऊस येत होता म्हणून लगेच पुढे निघालो. पुढे एका फौजी ढाब्यावर पोटभर मिसळ पाव खाऊन निघालो. भिगवण १२ किमी उरले होते. संध्याकाळचे सहा वाजले होते आणि माझ्या मागच्या चाकाचे टायर पंक्चर झाले होते. दोघांनी मिळून पंक्चर काढले आणि पुढे निघालो. भिगवणला पावणेसातला पोहोचलो. भिगवण हे पठारावर वसलेले, ग्रामपंचायत असलेले, सोयीसुविधांनी परिपूर्ण गाव. येथील लोकदेखील मोठ्या मनाचे. एक वर्षांपूर्वी भिगवण ग्रामस्थ, नेचर फाऊंडेशन व रोटरी क्लबतर्फे सेवालयातील एचआयव्ही बाधितांचा हॅपी म्युझिक शो आयोजित करून या लोकांनी सेवालयास मदतदेखील केली होती. आज त्याच गावात रवी बापटले सरांच्या पुढाकारातून संजय चौधरी, डॉ. खरड यांनी आमचे स्वागत केले. आमची राहण्याची व्यवस्था डॉ. जयप्रकाश खरड यांनी त्यांच्या घरी केली होती. डॉ. खरड स्क्रॅप बँकांच्या माध्यमातून गरजूंना मदत करतात. आम्हा सायकल वारकऱ्यांचे त्यांनी खूप छान आदरातिथ्य केले. डॉ. खरड मॅडमने आम्हा दोघांना ओवाळून संत तुकडोजी महाराज लिखित ग्रामगीता भेट दिली. साई मंदिर येथे ग्रामस्थ, रोटरी क्लब सदस्य, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, नेचर फाऊंडेशनचे सदस्य यांचा सत्कार स्वीकारला. जीवनरेखा बालगृहातील विद्यार्थांचे पुनर्वसन करताना आलेल्या अडचणी, या मुलांना शिक्षणाच्या व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न, पोषक आहार, शाळा अशा जबाबदाऱ्या, बालगृह चालकाचा अनागोंदी कारभार, भ्रष्टाचार, माहितीचा अधिकार अंतर्गत दिलेला लढा, जून २०१४ मध्ये ही मुले सेवालय प्रकल्प लातूर येथे स्थलांतरित झाल्यावर तेथील ७१ मुलांच्या विविध प्रश्नावर सुरू असलेले कार्य व एड्स जनजागृतीसाठी मागील चार वर्षात महाराष्ट्र, गुजरात, गोवा, राजस्थानमध्ये केलेल्या विविध मोहिमांतील अनुभव कथन केले.

रात्री आराम करून सकाळी सव्वासहाला पंढरपूरकडे निघालो. भिगवण इंदापूर हा पठार मार्ग असल्याने सतत चढ-उतार होता. रस्त्याच्या दुतर्फा डाळिंबाच्या बागांमुळे मन प्रसन्न होत होतं. साडेआठ वाजता इंदापूर बायपास मार्गे अकलूजकडे निघालो. वाऱ्यामुळे आमचा वेग २० वरून १४ झाला. तरी देखील दुतर्फा गुलमोहर, चिंच, वडाची झाडे यामुळे सावली होती. पाऊस नसल्याने प्रचंड उष्णता होती. वाटेत ठिकठिकाणी दिंडी, पालखीचे दर्शन घेत होतो. ज्ञानोबा तुकारामाच्या गजरात पायी चालणारे वारकरी पाहताना सायकल चालवताना येणारा थकवा निघून जात होता. सव्वा दहाला अकलूजला पोहोचलो. छान अमृततुल्य चहा घेतला व वेळापूरकडे निघालो. वेळापूर जवळ रस्त्याच्या दुतर्फा महाराष्ट्रातून विविध भागांतून आलेल्या पालख्या व वाहने होती. ज्ञानबा तुकारामचा जयघोष करत आम्हीदेखील वेळापुरात प्रवेश केला. वेळापूरमध्ये माझा मित्र सामाजिक कार्यकर्ता स्वामीराज भिसे यांनी व सर्व कुटुंबीयांनी स्वागत व आदरातिथ्य केले. या प्रसंगी पत्रकार मंडळींनी स्वागत व सत्कार केला. त्यांना आमच्या उपक्रमाविषयी माहिती सांगितली. छान चर्चा झाली. मग सव्वा बाराला निरोप घेऊन पंढरपूरकडे निघालो. वेळापूर पंढरपूर रस्त्यावर सर्वसाधारण वाहनांची वाहतूक बंद होती. आम्ही मस्त पेंडल मारत विठ्ठलाच्या दर्शनासाठी वेगात पेंडल मारत निघालो. वाटेत ड्युटीवर असलेले पोलीस भेटले. त्यांना आमच्या मोहिमेची माहिती दिली. पंढरपूर चौकातून आधी आमच्या विठ्ठलाकडे निघालो. अर्थात माणसामध्ये देव पहावा या संत तुकाराम महाराजांच्या शिकवणीप्रमाणे सर्वप्रथम पालवी या एचआयव्ही ग्रस्तांच्या प्रकल्पला भेट देऊन मुलांशी संवाद साधला. दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. पालवी संस्थेच्या डिंपलताई घाडगे, तेजस घाडगे यांच्याकडे मुलांसाठी आणलेले डिजिटल बीपी मशीन सुपूर्द केले. सोबत मुलांनी त्यांच्या कौशल्यातून तयार केलेल्या वस्तू विकत घेतल्या. पुढे विठ्ठलाचे मुख दर्शन घेऊन रेल्वेमध्ये सायकल बुक केली. आमचा उपक्रम, उद्देश पाहून बुकिंग ऑफिसर, कुली सर्वांनी सहकार्य केले. सचिन पुण्याला रवाना झाला. सायकल वारीच्या निमित्ताने भेटलेला हा दोस्त आपल्या गंगाखेडचाच. यापुढेही असेच उपक्रम घेऊन भेटू म्हणत त्याचा निरोप घेतला.

response.lokprabha@expressindia.com



लोकप्रभा Fri, 14 July 2017
epaper.lokprabha.com/c/20637994